# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

निवडणुक प्राथम्य

क्रमांक: ईएलआर-२०१९/प्र. क्र.९२१/१९/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ ऑगस्ट, २०१९.

प्रति,

**विभागीय आयुक्त व मतदार नोंदणी अधिकारी,**
**औरंगाबाद पदवीधर मतदारसंघ, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.**
**पुणे पदवीधर मतदारसंघ, पुणे विभाग, पुणे.**
**नागपुर पदवीधर मतदारसंघ, नागपुर विभाग, नागपुर.**
**अमरावती शिक्षक मतदारसंघ, अमरावती विभाग, अमरावती.**
**पुणे शिक्षक मतदारसंघ, पुणे विभाग, पुणे.**

**विषय** :- दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ **या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर** व शिक्षक मतदारसंघाच्या **मतदार याद्या नव्याने** तयार करणेबाबतचा कार्यक्रम...

**संदर्भ** :-भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३७/LC/LET/ECI/FUNC/ERD/ER/२०१९-II, दिनांक ३१ जुलै, २०१९.

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत भारत निवडणूक आयोगाचे दि. ३१ जुलै, २०१९ चे पत्र सोबत जोडले आहे.

२. भारत निवडणूक आयोगाने दिनांक ५ सप्टेंबर, २०१६ च्या पत्रान्वये पदवीधर व शिक्षक मतदार संघाची मतदार याद्या तयार करण्याच्या संदर्भात सुधारित सर्वसमावेशक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या (de-novo) तयार करावयाच्या आहेत. तसेच दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत अमरावती व नाशिक विभागातील पदवीधर व औरंगाबाद, कोकण व नागपूर विभागातील शिक्षक मतदार संघांसाठी मतदार याद्यांचा पुनरिक्षण कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने घोषित केला असून तो खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुनरिक्षण कार्यक्रमाचे टप्पे | कालावधी |
|---|---|---|
| १. | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (३) अन्वये जाहीर सूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. १ ऑक्टोबर,२०१९ (मंगळवार) |
| २. | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची प्रथम पुर्नप्रसिध्दी | दि. १५ ऑक्टोबर,२०१९ (मंगळवार) |
| ३. | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी | दि.२५ ऑक्टोबर, २०१९ (शुक्रवार) |
| ४. | नमूना १८ किंवा १९ द्वारे दावे व हरकती स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | दि. ६ नोव्हेंबर, २०१९ (बुधवार) |
| ५. | हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई | दि. १९ नोव्हेंबर, २०१९ (मंगळवार) |

| | | |
|---|---|---|
| ६. | प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी | दि. २३ नोव्हेंबर, २०१९ (शनिवार) |
| ७. | दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी | दि. २३ नोव्हेंबर, २०१९ (शनिवार) ते दि. ९ डिसेंबर, २०१९ (सोमवार) |
| ८. | दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे | दि. २६ डिसेंबर, २०१९ (गुरवार) |
| ९. | मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी | दि. ३० डिसेंबर, २०१९ (सोमवार) |

३. पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या मतदार याद्या तयार करण्याच्या अनुषंगाने लागणाऱ्या विविध नमुन्यांच्या छपाईचे आदेश मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून शासकीय मुद्रणालय, मुंबई यांना देण्यात येत असून सदर नमुने आपणास संबंधित शासकीय मुद्रणालयाकडून प्राप्त होतील

४. वरील कार्यक्रमानुसार तसेच भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी, ही विनंती.

आपला,

(अ. ना. वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

सहपत्र :- वरीलप्रमाणे

**प्रत- जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी**, पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, कोल्हापुर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातुर, बीड,अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, नागपुर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपुर व गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहिस्तव अग्रेषित